# MAHARASHTRA STATE COUNCIL OF EXAMINATION, PUNE

Government Commercial Certificate Examination

**2 JULY, 2018**

[Time : 09-00]

(Total Marks for Sections I and II : 100)

**MARATHI TYPEWRITING**

(30 Words Per Minute)

**SECTION - II**

(Time Allowed : 7 Minutes)

**मराठी टंकलेखन**

(३० शब्द प्रति मिनिट)

**विभाग - २**

(वेळ : ७ मिनिटे)

**सूचना :** गती उतारा एकदा टंकलिखित झाल्यावर पुन्हा तोच उतारा टंकलिखित करु नये. खालील मजकूर डाव्या बाजूस १५ पदे समास सोडून द्विपंक्ती अंतराने टंकलिखित करा.

---

**[गुण : ४०]**

मानवाचं शरीर हे पंचमहाभूतांनी तयार झालं आहे. पंचमहाभूतांचे गुण शब्द, रूप, रस व रंग आहेत. या गुणांद्वारेच मानवाला या जगताचं ज्ञान घेता येतं. परंतु यातून रसास्वादन, आनंद घेताना मानव आपल्या विकारामुळे, रज, तम गुणांमुळे विकाराचंच आस्वादन घेतो. विषयाच्या आस्वादनात त्याला इतकी गोडी लागते की तो आसक्त होतो. या अतिआसक्तीमुळे खऱ्या आनंदापासून तो वंचित राहतो आणि दुःखच ओढवून घेतो आणि शेवटी त्यातच त्याचा अंत होतो. म्हणून श्री गणेशाच्या उपासनेने त्याला जाणून घेतलं असता आपले विकार कमी होऊन तो सत्वगुणी होऊन तो शब्द, स्पर्श व रूप याद्वारे आनंदाचं आस्वादन घेऊ शकतो. याकरिताच श्री गणेशाने आपल्याला भाषा व लिपीद्वारे वेदाचं ज्ञान दिलं आहे. एवढंच नव्हे तर हे वर्ण मातृका म्हणून अव्यक्त स्वरूपात सहा चक्रांच्या ठिकाणी वसत आहेत. अशा रीतीने श्रीगणेश जो वर्णरूपाने सगुण स्वरुपात आहे तोच मातृका म्हणून अंतरंगांत शक्ती माध्यमातून वास करत आहे. तेव्हा हे गणेशाचं सूक्ष्मरूप त्याच्या अंगप्रत्यंगाद्वारे या वाङ्मय स्वरूपातून समजून घेऊन त्याची उपासना करणं आवश्यक आहे.

त्याला पायदळी तुडवल्या जाणाऱ्या दूर्वांफार प्रिय आहेत.